VOL- IX | ISSUE- XII | DECEMBER | 2022 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.331 | ISSN 2349-638x

# श्यामची आई पुस्तक आणि नितीमत्तेचे बदलेले संदर्भ

**डॉ.संजय जनार्दन आगलावे**
सहयोगी प्राध्यापक ( मराठी विभाग )
जे.डी.पाटील सांगळूदकर महाविद्यालय, दर्यापूर जिल्हा अमरावती.
Email :- aglawesanjaysir@gmail.com

आज मूल्य शिक्षणाची गरज नव्याने पडत आहे , मधल्या भौतिक, , औद्योगिक प्रगतीच्या कालखंडात याचा आपल्याला विसर पडला, वेगवान पद्धतीने भौतिक प्रगती होत असतांना मूल्यांची जपवणूक करायला आपण कुठेतरी विसरायला लागलो , त्याचे परिणाम सार्वजनिक , वैयक्तिक ,कौटुंबिक जीवनावर व्हायला लागले , त्यामुळे मूल्य शिक्षणाची गरज कधी नव्हे ती जाणवायला लागली.

मराठी साहित्याचा बराच मोठा कालखंड हा आदर्शवादी साहित्याचा होता , त्यावेळची सामाजिक गरज म्हणून कदाचित आदर्शवाद साहत्यात प्रकर्षाने येत होता किंबहुना समाजाचा नैतिक दबाव एकदंरच समाजावर होता, बऱ्याचदा या आदर्शवादाचा अतिरेकी पाठपुरावा, किंवा अट्टाहासाला अनेकदा साहित्य बळी पडते त्यामुळे त्याच्या कलाकृतीतील साहित्य मूल्य हरवून ते प्रचारकी थाटाचे होते असा आक्षेप घेतल्या जातो.पण आज बदलत्या काळात मूल्य शिक्षणाची गरज पुन्हा एकदा पडू लागली आहे, शालेय, महाविद्यालयीन अभ्यासक्रम मूल्य शिक्षण विषयावर आधारित अभ्यासक्रम तयार होत आहे ही काळाची गरज झाली आहे.मूल्य, संस्कार , संस्कृती याचा विसर पडत आहे , चंगळवादाचा अगदी महापूर आलेला आहे , सुखी असण्यापेक्षा सुखी आहे हे दाखवणे गरजेचे झाले आहे, आपण किती महागड्या हॉटेल मध्ये जेवायला जातो , कुठे कुठे फिरायला जातो ,लग्न आदी कार्यक्रमात संगीत आदी कार्यक्रम झालेच पाहिजे , वेगवेगळे इव्हेंट झालेच पाहिजे एकदंरीच उच्चभ्रू समाजातच आढळून येणारा हा चंगळवाद मध्यमवर्गीय माणसाच्या घरात पोहचला आहे , किंबहूना त्याची चढाओढच लागलेली आहे.सुखी जीवनाची कल्पना या सगळ्यांना वगळून करणे कठीण झाले आहे. भौतिक सुखाचा आनंद घेणे वाईट नाही पण यातून कर्जबाजारी पण वाढत असेल , नैराश्य निर्माण होत असेल तर , अपराध घडत असतील , आपल्या गरिब आई वडिलांची लाज वाटायला लागत असेल तर समाज व्यवस्था, कुटुंब संस्था संपायला लागली तर आश्चर्य वाटायचे कारण नाही. हा बदल अलीकडच्या काही वर्षांतील आहे. जो मध्यमवर्गीय समाज नीतिमत्ता मूल्य जोपासण्यात अव्वल होता तो वर्ग याला जोखड समजायला लागला. यातून अनेक वाईट घटना घडतांना दिसत आहे.

मूल्यांचा एकंदरीतच होणारा ऱ्हास थांबविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे झाले आहे. यासाठी विचारांची जडणघडण योग्य दिशेने होणे आवश्यक झाले आहे. यासाठी संस्कारक्षम साहित्याची कधी नव्हे अशी गरज निर्माण झाली आहे.

मराठीतील संस्कारक्षम साहित्याचा विचार करतांना सानेगुरुजींनी लिहलेले साहित्य हे महत्त्वाचे आहे त्यातही श्यामची आई हे पुस्तक संस्कारक्षम साहित्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे या पुस्तकांनी अनेकांना संस्कारक्षम बनवले त्या काळातील शालेय

विद्यार्थ्यांनी श्यामची आई हे पुस्तक वाचले आहे व त्यातून जीवनाचा खरा अर्थ त्यांनी समजून घेतला आहे.

नाशिक येथे तुरुंगात असतांना बेचाळीस रात्रीतून त्यांनी त्यांच्या मातेच्या आठवणी लिहून काढल्या आईच्या आठवणीनी त्यांचे हृदय भरलेले असे तिच्या आठवणी सांगताना नकळत त्यांचे डोळे पाणावतात या पुस्तकामध्ये साने गुरुजी यांनी आपल्या हृदय ओतलेले आहे वाचक ही हे पुस्तक वाचताना कळत नकळत आईच्या आठवणीत रमतो आपल्या मुलांवर निर्व्याज प्रेम करणारी आई ईश्वराचे रूपच आहे यात काहीएक शंका नाही.आपल्या आश्रमातील सोबती मुलांना आपली जीवन कहाणी सांगताना आई आणि वडिलांची वागणूक चांगली ,सदाचारी असेल तर त्याचा चांगला परिणाम मुलांच्या जीवनावर होतो, मुलांचे जीवन बिघडवणे यासारखे दुसरे पाप नाही , मुलावर चांगले संस्कार करणे ही आई वडिलांची जबाबदारी आहे. साने गुरुजी यांचे व्यक्तिमत्व विनयशील आहे स्वतःबद्दल बोलण्याचा त्यांचा स्वभाव नाही. किंबहुना मागील आठवणी काढून आपल्या दुर्गुणाची उजळणी नको , आपले जीवन दोषमुक्त असावे निर्मळ असावे हेच त्यांचे ध्येय होते. पण आश्रमातील सवंगड्यांनी आग्रह केल्यानंतर ते आपल्या आईच्या आठवणी सांगायला लागतात. एकदा त्यांची आई त्यांच्या वडिलांच्या आयुष्यासाठी सावित्रीचे व्रत करत होती पण आजार पणामुळे तिला वडाला प्रदक्षिणा घालणं कठीण जात होते, तेव्हा उरलेल्या प्रदक्षिणा तिने श्यामला घालायला सांगितले पण श्यामला याची लाज वाटत होती मला बायका हसतील, वर्गातली मुले हसतील या सर्वाची त्याला लाज वाटत होती. पण आई त्याला म्हणते देवाचे काम करायला कसली लाज. देवाचे काम करतांना लाजू नये वाईट काम करतांना लाज वाटली पाहिजे.चोरी करतांना लाज वाटली पाहिजे कृष्ण सुद्धा घोडी हाके ,उष्टे काढी, चांगले काम करतांना लाज बाळगू नये ही शिकवण आहे श्यामला सुरुवातीला चांगल्या गोष्टीचे महत्व समजत नव्हते त्याकडे तो दुर्लक्ष करी पण त्याची आई प्रसंगी प्रेमाने प्रसंगी थोडे कठोर होऊन त्याला समजावून सांगत असे आपला मुलाला चांगल्या कामाची लाज वाटू नये, आपल्याला वाईट पुस्तके, वाईट चित्रपट , वाईट व्यसने , भ्रष्टाचार करून मिळवलेला पैसा याची लाज वाटत नाही , उलट यात मोठेपणा वाटतो, मूल्यांचा होणारा ऱ्हास यासाठी कारणीभूत आहे.अक्काचे लग्न यात हुंड्याच्या चालीमुळे तसेच मंगळ असल्यामुळे लग्न जुळत नाही एका शोषिक , कनवाळू, दयाळू , मुलीला सासुरवास यावा याचे त्यांनी दुःख आहे हुड्याची चाल रद्द व्हावी , मुलीचे पैसे घेणे वा मुलाचे घेणे, दोन्ही सारखेच चुकीचे. गाईसही विकू नये असे सांगणारा आपला श्रेष्ठ धर्म आहे. धर्म केवळ सांगण्याची गोष्ट नाही तर त्यातील तत्वे आचरणात आणली गेली तरच अर्थ आहे. तरुणाईने वाईट गोष्टी ना विरोध दर्शनासाठी पुढे आले पाहिजे असे त्यांना वाटते. श्यामची आई त्यांच्या नंनदेच्या रडणाऱ्या मुलाला आपले दुध पाजायची आपला परका असा भेदभाव तीच्या ठिकाणी नव्हता रडणाऱ्या मुलांना पाजणे यामध्ये तीला परमधन्यता वाटे दुसऱ्याचे दुःख दुर करणे त्याला सुखावणे यात मोठा आनंद आहे स्वतःच्या मुलाचे कोडकौतुक कोणीही करतो पण दुसऱ्यासाठी हे सर्वात महत्त्वाचे आहे. आज काही ठिकाणी अनाथ आईपासून दुरावलेल्या दुध पाजायला जाणाऱ्या माता दिसत आहे साने गुरुजींना अपेक्षित असलेल्या खरा तो एकची धर्म या प्रार्थनेला मुर्त रुप देणाऱ्या या भगिनींना बघून खरच धन्य झाले असे म्हणावे लागेल.

श्रमजीवी वर्गाबद्दल अपार सहानुभूती साने गुरुजींच्या मनात आहे याचे संस्कार त्यांच्या आईने केले. मथुरी नावाची कांडपिणी करणारी स्त्री होती ती एकदा आजारी पडली त्यावेळी श्यामची आई सातत्याने तीची काळजी घेई , तीच्या खाण्यापिण्याची , तीला घरगुती औषधांची मदत ती करत असे त्याच्या आईच्या एकंदरीत स्वभावामुळे जेव्हा एखादे वेळी कोकणात जाई तेव्हा तीच्या मनात श्यामच्या आईच्या आठवणी होत्या.सर्वांनवर तिचा लोभ होता. आपल शरीर व

आपले कपडे स्वच्छ राहण्यासाठी आपण धडपडतो पण आपले मन निर्मळ नाही म्हणून आत्मपरीक्षण करणारे फार दुर्मिळ, उलट आजच्या काळात आपल्या वाईट कृत्याचे येनकेन प्रकारे समर्थक करणारे अनेक सापडतात यासाठी कोठल्याही थराला जायची त्यांची तयारी असते.

कर्मात आनंद असतो आपल्या प्रयत्नांनी आपण जेव्हा एखादी गोष्ट पुर्णत्वास नेतो त्याचा आनंद अवर्णनीय असतो. यासाठी खुप मोठ्या गोष्टी केल्या पाहिजे असे नाही.पत्रावळ यामध्ये श्याम पत्रावळ करण्यात साठी तयार नसतो त्याला तसेच जेवायचे असते , पण त्याची आईने ज्यांना जेवायचे असेल त्यांनी स्वतः ची पत्रावळ स्वतः तयार करावी लागेल अशी कठोर भूमिका घेतली आपल्या मुलांना चांगली सवय लागावी म्हणून तीने घेतलेल्या भूमिकेतून श्यामला कर्माचे महत्त्व समजते कर्मा मुळे मिळणारा आनंद श्रेष्ठ असतो.

संस्कृती विषयी सानेगुरुजी म्हणतात “ मित्रांनो प्रत्येक गोष्टीत संस्कृती भरलेली आहे.प्रत्येक जातीची विशिष्ट संस्कृती असते .सर्वांची मिळून राष्ट्रीय संस्कृती होत असते. प्रत्येक चालीरीतीत संस्कृतीचा सुगंध भरलेला आहे. काही अनुपयुक्त चाली असतील त्या सोडून दिल्या पाहिजेत. श्याम शाळेमध्ये असतांना पंगती मध्ये श्लोक म्हणायची प्रथा होती , यासाठी मुलांमध्ये चढाओढ होती श्यामला पंगतीत श्लोक म्हणायला लाज वाटत होती, यासाठी एकदा त्याने श्लोक म्हटल्याचे खोटेच सांगितले त्यामुळे वडील रागावले, परंतु त्यांच्या आईने समजावून सांगितले की खोटे बोलू नये, लहानपणी जे संस्कार मुलांना दिले जातात ते आयुष्य भर कामाला येतात.

मोरी गाय यामध्ये मोरी गाय गेल्यामुळे घराला अवकळा आली असे श्यामची आई म्हणते ती व्यापक अर्थाने ज्या दिवसापासून आपण गाईला अंतर दिले तेव्हा पासून सर्वत्र अवकळा आली तुमचे गोकुळ नष्टप्राय झाले.

भाऊबंदकी हा आपल्या समाजाला लागलेला शाप आहे याची झळ श्यामच्या आई वडिलांना बसली भरल्या घरातून त्यांना अपमानित करून हुसकावून लावण्यात आले.त्यामुळे श्यामला त्यांच्या आई वडिलांच्या सोबत त्याच्या आजोळी यावे लागते. पण त्यांच्या आईला माहेरी नवऱ्यासह राहणे अपमानास्पद वाटे त्यामुळे कसे का होईना घर बांधावे कारण चांगल्या परिस्थितीत अपमानास्पद जगण्यापेक्षा स्वतंत्रपणे जगणे महत्वाचे त्यापेक्षा कुठल्याही दागिना श्रेष्ठ नाही. स्वातंत्र्याचा शृंगार हाच सर्वात शोभादायक व मौल्यवान शृंगार आहे.

कोणत्याही आईला आपले मुल भित्रे असावे असे वाटत नाही, परंतु आजकाल मुलांचे अनावश्यक लाड किंवा आवश्यकतेपेक्षा जास्त जपण्याचा प्रयत्न या प्रयत्नात कधी कधी मूल भेकड होते त्यांच्या मध्ये संकटांना सामोरे जाण्याचे धारिष्ट्य राहात नाही. पण श्यामची आई मुलांचे फाजील लाड करत नसे कोकणामध्ये पाऊस मोठ्या प्रमाणात पडतो.पावसाळ्यात तेथे पोहण्याची मौज होती.नवीन मुलांना याच दरम्यान पोहायला शिकवले जाई. कोकणात अनेक जण पट्टीचे पोहणारे होते त्यामध्ये श्यामचे चुलते होते त्यांच्या वडिलांना देखील चांगले पोहता येत होते.पण श्यामच्या मनात पोहायची भिती होती.त्याची आई नेहमी त्याला पोहायला शिकायचा आग्रह धरी परंतु तो काही केल्या मनावर घेत नसे.एक दिवस मुले त्याला पोहायला शिकवायला आली तेव्हा श्याम लपून बसला पण आई त्याला रागावली व त्याला धरून न्यायला सांगितले. मुलानी त्याला पाण्यात ढकलले व त्याला पोहायला शिकवायला सुरुवात केली त्यामुळे त्यांच्या मनातील भिती दुर झाली. आई म्हणली “अरे, पाण्यात पडल्याशिवाय, नाकातोंडात पाणी गेल्याशिवाय भीती जात नाही. मुलांच्या मनातील अनावश्यक भिती काढण्यासाठी कधी कधी पालकांना कठोर व्हावे लागते.

स्वाभिमान हा मानवी जीवनासाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे ,स्वाभिमान नसेल तर मानवी

जीवनाला अर्थ राहत नाही. पण स्वाभिमान नसल्याने अनेक श्रीमंत लोक गरिबांसाठी असलेल्या सवलती पदरात पाडून घेतांना दिसतात. अलिकडच्या काळात मोठ्या खासगी शाळेमध्ये गरीब मुलांसाठी राखून ठेवलेल्या जागा साठी अनेक श्रीमंत अर्ज करतांना दिसतात.एकदा श्यामला कोणी तरी दक्षिणा दिली पण त्यांच्या आईला ते योग्य वाटले नाही. दक्षिणा ही गृहस्थाने घ्यायची नसते तर ती भिक्षूकाने घ्यायची असते. युरोपियन देशात स्वाभिमानी वृत्ती लहानपणीच शिकवल्या जाते.तीथे कोणावरही अवलंबून राहणे योग्य मानले जात नाही. जाणत्या वयात मुले स्वावलंबन शिकतात. सानेगुरुजींना श्रमजीवी लोक पवित्र वाटतात उन्हातान्हात काय करणारा मजूर असो किंवा कोणतेही समाजोपयोगी काम करण्यासाठी कष्टकरी त्यांना श्रेष्ठ वाटतो. जगाच्या समाजाच्या हितासाठी कार्यरत राहणे आवश्यक आहे असे त्यांना वाटते.

दुसऱ्यांना मदत करण्यासाठी आपण सदैव तत्पर असले पाहिजे श्यामची आई श्रीखंडाच्या वड्या फार सुंदर करी शेजारच्या पार्वतीबाई यांची मुलगी वेणू माहेरी आली होती तीला सासरी नेण्यासाठी वड्या तयार करण्यासाठी श्यामच्या आईला बोलावण्यात आले होते.श्यामची आई या दरम्यान आजारी असते तरीही ती वड्या करायला जाते वेणूच्या सासरच्यांनी वेणूच्या माहेरच्या लोकांना नावे ठेवू नये म्हणून मी आले पार्वतीबाई आणि श्यामची आई मैत्रीणी मैत्री जपतांना आपल्यातले सद्गुण सदैव लक्षात राहतात.

भक्ती करतांना कशी करावी ? पाचवीत असतांना त्यांच्या गावात चातुर्मासात गणपतीच्या देवळात रोज पुराण होत असे पुराण चालू असतांना घरी श्याम आणि त्याचे मित्र घरात रिकामे डबे , टाळ घेऊन कर्कश आवाजात भजन म्हणत होते.त्यामुळे देवळातील मंडळी नाराज झाली. घरातल्या माणसांनाही समजत नाही काय? असे ती मंडळी बोलायला लागली , त्यामुळे श्यामच्या आईला वाईट वाटले. तीने श्यामला समजावले दुसऱ्यांना त्रास होत असेल तर ते कसले भजन, किंवा ज्या पूजेमूळे दुसऱ्याला त्रास होत असेल किंवा दुसऱ्याच्या पूजेत अडथळा निर्माण होत असेल तर ते योग्य होणार नाही. श्यामला आईचे म्हणणे पटले, पण त्याच्या मित्रांना वाटले श्याम भित्रा आहे , पण विचाराने वागण्यात भित्रेपणा नाही, किंवा अविचाराने वागणे म्हणजे पराक्रम नाही.असे त्याला वाटते.

श्यामच्या लहानपणी आजच्या सारखी समृद्धी नव्हती आज जसे लहान मुलांना पाटी ,पेन्सिल,पुस्तके खोड रबर, पेन,वह्या मुबलक प्रमाणात आई-वडील उपलब्ध करून देतात त्यामुळे बऱ्याचदा त्यांना त्याची कदर नसते या वस्तू जपून वापराल्या पाहिजे, असे कोणी त्यांना सांगत नाही नासधूस करणे वाया घालवणे, हरवणे अशा वाईट सवयी बऱ्याचदा त्या मुलांना त्यामुळे लागतात. पण श्याम लहान असताना या सर्व गोष्टीची चणचण होती, सर्व मुलांना पाहिजे ती पुस्तके व ईतर शैक्षणिक साहित्य सहजतेने मिळत नव्हते पण त्यामुळे स्वावलंबनाचा किंवा काटकसरीचा धडा अनायसे मिळत होता. श्याम आपली लहानपणी ची आठवण सांगतो त्याला रामरक्षा येत नव्हती आणि त्याचे पुस्तक सुद्धा त्यांच्या जवळ नव्हते शेजारी राहणाऱ्या गोविंदभट परांजपे यांचा मुलगा भास्कर यांच्या जवळ रामरक्षा होती व त्यातील रोज एक दोन श्लोक तो पाठ करीत असे, तो श्याम घरी येऊन ती म्हणून दाखवी त्यामुळे त्याला वाटे की मुद्दाम आपल्याला खिजवायला तो येत आहे , त्यामुळे श्यामला त्याचा राग येई.तो चिडून त्याच्या अंगावर धावून जाई, आईने त्याला समजावले शेजाऱ्यांच्या आंगावर असे धावून जाणे योग्य नाही, तुझ्या जवळ पुस्तक नसेल, तर तू उतरवून घे श्यामने पुस्तक भास्करच्या आईला विनंती करून मिळविले, व सुवाच्य अक्षरात रामरक्षा लिहून घेतली आणि आईच्या सांगण्यानुसार रामरक्षा पाठ करून वडिलांना म्हणून दाखवली वडिलांनी पाठीवरून हात फिरवला त्यामुळे त्याला अतिशय आनंद झाला. आईने स्वावलंबनाचे महत्व पटवून सांगितले ,रामरक्षा पाठ नाही पुस्तक नाही असे म्हणून स्वस्थपणे बसला असता तर परावलंबी

राहिला असता , आयुष्यात यापासून धडा घेऊन कधी परावलंबी राहू नको.

दुसऱ्याच्या मनाचा विचार करणे ही फार महत्त्वाची बाब आहे अनुभवातूनच खरे शिक्षण मिळते कसे बोलावे कसे जेवावे याची सुद्धा आपल्याकडे संस्कृती आहे पण ही संस्कृती आपण विसरत आहोत लग्न आदी समारंभात अन्नाची होणारी नासाडी, चमचमीत पदार्थांची रेलचेल त्यासाठी चाललेली चढाओढ बघता अन्न हे पूर्णब्रह्म ही अन्नाचा आदर करणारी आपली संस्कृती आपण विसरत चाललो असे वाटते.श्याम अतिशय भाग्यवान होता कारण अत्यंत चांगले संस्कार त्याच्यावर केले गेले.आपल्या पानाकडे पाहून जेवावे, गरज नसतांना अधिकचे अन्न ताटात वाढून घेऊ नये.पानात गुंतवळ किंवा काही सापडले तर त्याची वाच्यता करु नये , पानावरील पदार्थांवर टीका करु नये , पानाभोवती शिते सांडू नये, पान स्वच्छ करावे असा त्यांच्या वडिलांचा दंडक होता त्याचे ते स्वतः पालन करायचे. अन्न वाया घालवणे किंवा अन्नाची नासाडी करणे , अन्नाला नावे ठेवणे त्यांना आवडत नव्हते, जिभेचे चोचले पुरवण्यासाठी आपले जीवन नाही तर जीभेवर आपण संयम ठेवला पाहिजे असे त्याच्यावर संस्कार होते त्यामुळे अळणी भाजीही ते कुठल्याही प्रकारची तक्रार न करता खात.

शाळा म्हणजे मुलांचे संस्कार केंद्र पण बऱ्याचवेळा मुलांना तो सासुरवास वाटतो, शिक्षक म्हणजे विद्यार्थ्यांना झोडपून काढणारा असे चित्र दिसते.किंवा सासुरवास म्हणजे सुनेला छळणारा वाईट प्रकार. शाळा व सासर यांचे माहेर झाले पाहिजे , आपल्यात माणूसकी असली पाहिजे, आपण थोर संस्कृतीचे वारस पण आपण साधी माणूसकी विसरत चाललो हे बघून त्यांचे हृदय पिळवटून निघते.संवेदनशील समाजाची राष्ट्राला गरज आहे त्यांना वाटते.

दुर्वांची आजी यामध्ये मानवी स्वभावाचे वर्णन आले आहे. तीचा श्यामच्या वडिलांन वर लोभ होता तीच्यामध्ये खूप गुण होते , तीचा घरच्या व ईतर कामात हातखंडा होता. एकदा तीच्या भरवशावर आईने भाजणी दळण्याचे काम करायचे ठरविले पण ऐनवेळी आजीने दसऱ्याच्या घरचे काम आल्यानंतर तेथे जायचे ठरवले. काही लोक घराबाहेरील कामे मोठ्या उत्साहाने करतात पण घरची कामे करतांना मात्र करत नाही, बाहेरच्या लोकांनी आपल्याला चांगले म्हणावे , चार लोकांनी आपले गुण गावे म्हणून ती असे करतात पण घरच्या कामाची मात्र त्यांना तमा नसते, त्यामुळे दुर्वांची आजी आणि श्यामची आई यांचे वाद होई , पण नंतर आई नमते घेई आणि आजीचा राग निवळे, आईच्या हातून चूक झाली तरी ती कबूल करून पुढे जाण्याचा तीचा स्वभाव होता.आपल्या पेक्षा मोठ्या माणसांची क्षमा मागण्यात कुठलाही कमीपणा नाही.

प्रेमपूर्वक त्यागात आनंद आहे, पण आज आपण विसरत चालले आहे, स्वार्थासाठी वाटेल ते करण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे, यातून मिळालेला आनंद फार काळ टिकत नाही जीवनातील खरा आनंद त्यागात आहे श्यामच्या वडीलांचे धोतर फाटलेले होते , पण त्यावेळी त्यांची परिस्थिती फार वाईट झाली होती, अंगावर कर्ज झाले होते, दिवाळी तोंडावर आली होती, अशा वेळी श्यामच्या आईने तीला भाऊबीजेच्या पैशातून नवे धोतर घेतले , दुसऱ्यासाठी केलेल्या लहान लहान प्रेमपूर्वक त्यागातून खरा आनंद मिळतो.

आई म्हणायची जगात सारे पैशाला मान देतात , पंढरीनाथ नावाचे गृहस्थ होते ते गरीब होते तेव्हा त्यांना सारे पंड्या म्हणत , पण पुढे ते शिकले वकील झाले, मोठ्या प्रमाणात पैसा मिळविला , सोमेश्वराचा मोठा उत्सव केला तेव्हा लोक त्यांना पंढरीनाथबाबा म्हणू लागले लोक त्यांना मान दयायला लागले , पण हा मान आपला नाही तर आपल्या पैशाचा आहे, तुम्ही पैशाला मान देता माणसाला नाही, ज्यांच्या जवळ पैसा नाही त्याला आपण विचारत नाही हे वास्तव आहे.

श्यामची आई हे पुस्तक लहान लहान गोष्टीतुन माणूस कसा संस्कारक्षम होत जातो हे सांगणारे श्रेष्ठ पुस्तक आहे या पुस्तकाची कधी नव्हे ती गरज आजच्या काळात आहे यात शंका नाही.

**संदर्भ :-**

१) श्यामची आई, साने गुरुजी, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन आवृत्ती तिसरी पुनर्मुद्रन १९९०.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com